
फर्मान आणि
इतर
कविता
आशय आणि आस्वाद
संपादन : तुषार चांदवडकर

- **कवितेचा वारसा समृद्ध करणारी 'फर्मान'** .................. १५५
  – वि. दा. पिंगळे
- **संयत भावनाकल्लोळाचे उत्स्फूर्त आविष्करण** ............... १६१
  – सरिता पवार
- **फर्मान आणि इतर कविता : आशयवेध** .................... १६९
  – डॉ. ज्ञानेश्वर थोरात
- **कसदार काव्याशयाची करूणाष्टके** .......................... १७४
  – प्रा. वैजनाथ महाजन
- **रंजनापेक्षा झणझणीत अंजन घालणारी कविता** ............ १७९
  – डॉ. सुशीला सोलापुरे
- **सामाजिक, भाषिक आणि वाङ्मयीन परिप्रेक्षात 'फर्मान'** ...... १८९
  – प्रा. डॉ. सुरेश भिलकोटकर
- **वेदनेच्या गोतावळ्यात रममाण होणारी कविता** ............. २०७
  – विलास कांतीलाल मोरे
- **फर्मान आणि इतर कविता – मातृसूक्ताचे गोंदण** ........... २१२
  – प्रा. डॉ. भरतसिंग पाटील
- **'फर्मान' अनोखा काव्याविष्कार** ........................... २२१
  – प्रा. डॉ. सुभाष महाले
- **माणूसपण शोधणारी कविता** ................................ २२६
  – प्रा. डॉ. सुषमा विश्वरत्न तायडे (अहिरे)
- **गझलनामा** ................................................ २३०
  – प्रा. डॉ. रजनी नकुल लुंगसे

# सामाजिक, भाषिक आणि वाङ्मयीन परिप्रेक्षात 'फर्मान'

– प्रा. डॉ. सुरेश भिलकोटकर

### वा. ना. आंधळे यांची अनुभवसृष्टी आणि प्रतिमानसृष्टी

कवी हा मानवी आणि समाजजीवनाचा सूक्ष्म निरीक्षक असतो. वा. ना. यांच्या एकूण कवितांकडे नजर टाकल्यास ते विविध भूमिकांतून सामोरे येताना दिसतात. प्रस्तुत संग्रहातील ऐंशीपैकी जवळपास पंचवीस टक्के कविता या कौटुंबिक नात्यातील भावना आणि त्यांमधील वीण व्यक्त करणाऱ्या आहेत. या कवितांची नावेही माय, आई, बापा, पप्पा, लेक, मना, तुला, तुझे, किती किती मी, नको घाबरु बाळा, उंबरा-तोरण, आई मला जन्म घेऊ दे अशी कुटुंब संस्थेशी आणि तेथील विविध प्रतिमांशी निगडित आहेत.

'माय'चा घरासाठी त्याग रेखाटताना कवीला रोज तव्यासंगे खेळणारी आणि दिव्याखाली जळणारी आई दिसते. इतरांसाठी नवस करणारी, स्वत: अर्धपोटी राहून शाळा-पाटीची काळजी घेणारी, आपल्या पिल्लांना सावली देत देत अविश्रांत आयुष्य जगत केवळ स्मशानातच विसावा घेणारी कवीची 'माय' केवळ वा. नां.ची नव्हे तर समस्त विश्वातील दीनदुबळ्यांची आई दिसते. ही कविता वाचकास अंतर्मुख करते. प्रत्येक वाचकास आपल्या आईचे दर्शन या कवितेत घडते. स्वत: उपवास सोसून पिल्लांसाठी शिक्यावर सुरक्षित घास ठेवणारी 'आई' शेतात खुरपे चालविते. ठिगळ लावलेलं लुगडं नेसणारी आई आठवली की पुढे काळ बदलल्यावर बंगल्यात राहातानाही कवीचं मन जळतं. आईनं प्रतिकूल परिस्थितीत पार केलेल्या दिवसांच्या आठवणीनं त्यांचं मन तीळ-तीळ तुटतं. गलबलतं, अत्यंतिक संवेदनशील आणि परममातृप्रेमी कवीमनच असे अनुभव करू शकते. 'भोग' या कवितेत,

**काटे बाभळीच्या । जसे अंगावर**
**तशी दु:खावर । विसावली ।।**

अशी शब्दचमत्कृती प्रकट करताना कवीच्या भावविश्वातील आईरूपी स्त्री ही जन्माला येतानाच बाभळीसारखी आपल्या आयुष्यात काटे लेवूनच येते. काटेरी बाभळीच्या आयुष्याप्रमाणेच आयुष्य असलेल्या आईच्या जगण्याला

'दारिद्र्याची वडांग' जन्मोजन्मी पुरून उरलेली असते, हे प्रखर सत्य कवीने अधोरेखित केले आहे.

माय, आई आणि भोग या तिन्ही कविता वाचताना ग्रामीण आणि कृषक समाजातील आईचे वास्तव दर्शन घडते. आजवर मराठी रसिकांनी 'आई' या विषयावर असंख्य कविता पाहिल्या. वाचल्या. परंतु त्यांचे अनुभवविश्व शहरी आणि मध्यमवर्गीय स्वरूपाचे होते. वा. नां.च्या कवितेतील आई अस्सल ग्रामीण, अशिक्षित, कष्टकरी आणि आर्थिक तसेच सामाजिकदृष्ट्या निम्नस्तरीय वर्गाचे प्रतिनिधीत्व करणारी आहे. तिच्या अनुभवविश्वाला बिलगून आलेली राष्ट्रसंपत्ती आणि प्रतिमानसृष्टीही ग्रामीण अशिक्षित आहे. यामुळेच वा.नां.ची कविता पुणे-मुंबईतील वाचक व समीक्षकाला कळायला अवघड जाईल. कारण खुरपे, शिके, पोपडा, वडांग, पोतारा, पांग, पांभर, मिरग, उधाण, ढेकाळली, घुंगरली, काकड, कंदील इत्यादी राष्ट्र, शहरी आणि महानगरीय अनुभवविश्वात वाढलेल्या वाचक व अभ्यासकांना कळणे कठीण आहे. बाभळी, वडांग काट्याकुट्याचं झुडूप ही प्रतिमाने कवीच्या क्षेत्रीय प्रतिमान सृष्टीचे सूचक आहेत.

**वा. ना. आंधळे : कुटुंबवत्सल कवी**

वा. ना. आंधळे हे मातृभक्त कवी आहेत. तसे ते कुटुंबवत्सलही आहेत, याची साक्ष 'पप्पा' या कवितेत पटते.

**पप्पा माझ्या आईला बोलू नका,**
**स्त्री जन्म आहेच आधी मुका**

असे सांगताना संसारातील मोक्याच्या क्षणी आईने साधलेले मौन. या मौनामुळे टाळले गेलेले संघर्ष, बांधलेले स्नेहबंध कवी चपखलपणे मांडतो. या कवितेत कवी आईची बाजू घेणारा पूर्ण होतो. 'आई मला जन्म घेऊ दे' या कवितेत तो अर्भक स्वरूपातील मुलगी होतो. 'बापा' कवितेत बापाचं दुःख, कष्ट आणि घामातील न्हाणं जाणणारा हितचिंतक होतो, 'लेक' या कवितेत ज्याच्या घरी लेक त्याच्या घराला वळण अशी लेकीची महती सांगतो, तर उंबरा...तोरण या कवितेत आई-वडील दोघांचीही महती सांगून सेतू साधणारा बहुरूपी पण कुटुंबवत्सल मनाचा माणूस दिसतो. कवी वा. ना. आंधळेंची ही विविध भूमिकांमधून सहजपणे वावरणारी कविता वाचणे म्हणजे एक कौटुंबिक वात्सल्य सोहळा अनुभवल्याचा आनंद मिळतो.

'गीत' या कवितेत आपले कुटुंब, कुंकू, पुत्र, लेकी या सर्वांचे मिळून जणू गोकुळ अस्तित्वात असल्याची भावना व्यक्त केलेली दिसते. विशेष म्हणजे उत्तर-पूर्व खांदेशातील बोलीचा आणि शब्दांचा थेट वापर या कवितेत कवीने केला आहे. प्रमाण मराठीत 'माझं', 'तुझं' या शब्दांसाठी 'मह्य', 'तुह्य' या



प्रादेशिक बोलीतील शब्दांचा वापर कवीने केलेला आहे. तसेच 'ळ' या वर्णाक्षराऐवजी 'य' हे वर्णाक्षर गीत या कवितेत वापरलेले आहे.

आपल्या समाजातील हुंड्याची प्रथा, मुलगा वंशाचा दिवा, मुलगी परक्याचे धन अशा संकुचित परंपरांमुळे आणि दूषित दृष्टिकोनामुळे गेल्या अनेक पिढ्या समाजातील स्त्रीवर्गावर अनन्वित अत्याचार होत आले आहेत. अशा परिस्थितीत बहुसंख्य समाजाला अपत्य म्हणून मुलगी नकोशी वाटू लागली. यामुळे गेल्या काही दशकांत समाजातील स्त्रीजन्माचे प्रमाण लक्षणीयरित्या घटले. यात स्त्रीभ्रूणहत्येचा वाटा मोठा होता. या पार्श्वभूमीवर वा. ना. आंधळे यांची 'आई मला जन्म घेऊ दे!' ही कविता लक्षणीय ठरली. आईच्या उदरात विकसित होणाऱ्या स्त्रीभ्रूणाला आपलीही जन्माआधीच हत्या होणार अशी भीती वाटते. त्याच भावनेतून ती आपल्या जन्मदात्या आईला विनवते,

**'तू जसे पाहिले जग मला देखील पाहू दे**
**सांग आई बाबांना जन्म मला घेऊ दे'**

सध्याच्या शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आलेल्या या कवितेचे, कवीचे आणि शासन निर्णयाचेही कौतुक करायला हवे! साऱ्यांची होऊन, साऱ्यांचे आसवे पुसणारी मुलगी जन्म मागते आहे. अतिशय सोपा, सरळ आशय, साधी सोपी शब्दरचना, परंतु मोठा परिणाम साधणारी ही कविता सहजपणे समाजापर्यंत पोहोचते आहे. कोणतेही भव्यदिव्य शब्द व कृती नाही अथवा अलंकारिकतेचा वापर न करता प्रसिद्ध पावलेली ही आशयघन अशी कविता आहे.

याच आशयाच्या जवळपास जाणारी, त्याचबरोबर त्याग आणि उदात्त भावनेचा परिपोष असणारी 'नको घाबरु बाळा' ही कविता आहे. आपल्या बाळासाठी खऱ्याची आस आणि कास धरणारी, वाटेल ते कष्ट सोसणारी, कष्ट आणि उदात्ततेचा सतत ध्यास धरणारी आई म्हणते,

**देवाच्या दारी माझे, ते होईल तेव्हा जाणे**
**हे भिजतील माझे डोळे, अन् मिटतील आनंदाने**
**जन्मोजन्मी मी आई तू माझ्यापोटी आहे**
**या जन्माही जन्म हा माझा तुझ्याचसाठी आहे।।**

एवढी उदात्त आणि उच्च कोटीची भावना भारतीय आईमध्ये आहे. ती कवींच्या लेखणीतून अवतरते तेव्हा वा. ना. आंधळे हे मातृहृदयी कवी आहेत असे म्हटल्यास त्यात काहीही वावगे होणार नाही.

'आई मला जन्म घेऊ दे' या कवितेच्या पार्श्वभूमीवर 'काळजी करू नका' ही कविता पारंपरिक विचारसरणीची कास धरणारी दिसते. सासरी जाणारी लेक आपल्या पप्पाला काळजी करू नका असे सांगताना 'स्त्री जन्म मुका' असा

उल्लेख परंपरेच्या बेड्यांचे समर्थन करतो की काय, असा एक अर्थ निघतो, असा उल्लेख 'पप्पा' कवितेतही आहे. पण तो येथे अधिक गडद आणि स्त्रीचे परावलंबित्व अधोरेखित करताना दिसतो. कवितेत मुलगी म्हणते, 'तुम्ही माझे मुलासारखे लाड केलेत', ही भावनाही स्त्रीकडे परंपरेने बघण्याची मानसिकता दर्शविते. याच कवितासंग्रहात वा. ना. आंधळेंनी इतर कवितांत समाजातील परंपरावादी, बुरसटलेल्या आणि दांभिक विचारसरणीवर जोरदार टीका केलेली दिसते. पण येथील स्त्री परंपरेत अडकलेली दिसते.

'बाप' या कवितेत

**काट्याकुट्याचं झुडूपं । तसा घरीदारी बाप**
**किती भोग किती शाप । बापा तुला ।।**

सतत घामात न्हाणारा हा शेतीमालाचा सोबती आणि ढणढण जळणारा बाप कवीने यथार्थपणे उभा केला आहे.

'फर्मान आणि इतर कविता' या संग्रहात कुटुंब, त्यातील सदस्य, त्यांतील आंतरसंबंध आणि भावभावनांवर अनेक कविता आहेत. त्यांत आईचे स्थान आणि थोरवी जागोजाग प्रकटली आहे. आपल्या एकूणच साहित्यविश्वात कुटुंबातील आई, तिचे प्रेम, त्याग, कष्ट यांचा भरभरून उल्लेख येतो. त्या तुलनेत कुटुंब संस्थेतील बापाच्या भूमिकेला हवा तसा न्याय मिळताना दिसत नाही. वा. ना. आंधळे यांनी ही उणीव भरून काढली आहे. संग्रहातील 'उंबरा...तोरण' या कवितेत,

**काटा मोडता पायात येते ओठावर आई**
**बाप रंगवता देवा तुझी वाळली का शाई**
**असा प्रश्न कवी उपस्थित करतो. तसेच,**
**आई आसवांची भाषा आई प्रेरणेची उषा**
**बाप जळताना आत उजळती दाही दिशा**

अशी आईबरोबरच बापाचीही महती समस्त मराठी समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न येथे कवीने केला आहे. पारंपरिक कुटुंबसंस्थेवर आणि त्यांतील नात्यांतल्या भावसंबंधांवर कवीचा विलक्षण विश्वास दिसतो. यामुळेच कुटुंबातील प्रत्येक नात्यातील महती त्यांना पटते. ती सांगावीशी आणि मांडावीशी वाटते 'लेक' या कवितेतील कन्येची म्हणजे मुलीची महती व्यक्त करताना,

**ज्याच्या घरामध्ये लेक त्याच्या घराला वळण**
**जसं देव्हाऱ्यात शोभे पानाफुलांचं तोरण**

अशी घराची, समाजाची आणि संस्कृतीची शिस्त पाळून लेक घराची शोभा वाढवते, असे कवीला सांगायचे आहे. तिच्या समाजसुलभ, निसर्गसुलभ



स्वभावाने घर प्रकाशमान होते. घरात लेकीचा जन्म म्हणजे त्यासाठी पुण्याई असावी लागते, असे कवीला वाटते.

**बालपणातील अनुभवविश्व**

कौटुंबिक नात्यांमधील विविध भावरंगांची उधळण आपल्या कवितेत करणारा हा कवी आपले बालपणही विसरताना दिसत नाही. आपल्या बालपणात डोकावताना, 'ते दिवस उडून गेलेत' या कवितेत ते म्हणतात,

**ते दिवस उडून गेलेत**
**जेव्हा मुले शिकायची**
**दिसल्याबरोबर गुरुजी**
**कमरेमध्ये वाकायची**

येथे बालपणीच्या आठवणी, गतकालीन शिक्षण घेणारे विद्यार्थी, हवीहवीशी वाटणारी शाळा, शिस्त, शिक्षकांबद्दलचा आदर कवीला आठवतो आणि हे सारेच उडून गेल्याची, निसटून गेल्याची खंत दिसते. काहीसा असाच आशय असणारी 'चार कविता' ही कविता आहे.

**रडता रडता हसायचे दिवस छान होते**
**आभाळाच्या फांदीला हिरवेगार पान होते**
**यासोबत,**
**चुरगळलेल्या उन्हाला आपण आपलं अंगण द्यावं**
**त्यावर सडा घालताना किमान एक थेंब व्हावं**

इतरांना काहीतरी देण्याची आणि समर्पणाची भावना येथे आहे.

निसर्ग आणि कृषीसंस्कृतीशी नाते सांगणारी शब्द, अलंकार आणि प्रतिमासृष्टी आहे.

वा. ना. आंधळे हे ग्रामीण आणि कुटुंबवत्सल कवी आहेत. त्यांचे वास्तव्य ग्रामीण भागात व्यतीत झाल्याने सभोवतालचा निसर्ग त्यांच्या कवितेत सातत्याने डोकावताना दिसतो. याचमुळे सूर्य उगवण्याआधीच भल्या पहाटे वारा कानोसे घेताना त्यांना 'ठसे' या कवितेत दिसतो. 'गेले' या गझलमध्ये निसर्गचित्रण करताना पक्षी उडून जाण्याची, हंगाम संपण्याची आणि पौर्णिमेच्या प्रकाशात तारे झाकोळण्याची खंत त्यांच्या मनातून व्यक्त होते. 'दान' या कवितेत,

**पावसात भिजे । काळी काळी माती**
**दाणे बिलगती । कणसाला ।।**
**धांड्यावर झुले । दिमाखात गोंडा**
**पानातून झेंडा । फडकला ।।**

कृषी संस्कृतीचे इतके वास्तवदर्शी आणि वाङ्मयीनदृष्ट्या उच्च प्रतीचे

सृजन मराठी साहित्यात विरळपणे दिसते. पांभर, मिरग, कणीस, उधाणले शब्दांचा वापर कृषी आणि ग्रामसंस्कृतीशी नाळ जोडलेली व्यक्तीच आपल्या लेखनात करू शकते.

'लेणं' या कवितेत शेती आणि निसर्गाच्या साथीने नवनिर्माण आणि सृजनाची मांडणी कवीने केलेली आहे. पावसाळा, शेती, पेरणी, बाया-माणसांची लगबग आणि बिजाचं अंकुरणं याने कवीमन हर्षभरित होताना दिसते. नव्या अंकुराच्या आगमनाने आनंद होतोच पण त्याचबरोबर खोच्यामध्ये काकडणारी गाणी कवीला अस्वस्थ करतात. केवढी ही संवेदनशीलता! निसर्ग आणि कृषी चित्रण करता करता या संस्कृतीशी घट्ट बांधलेली ढेकाळली, घुंगरली, काकडली, हिरहिरवले अशी शब्दचमत्कृतीही आपल्याला अनुभवायला मिळते. 'पेऱ्ह वं बाई' या कवितेत तिफण, रास, कुनबटी, पिकपेरा, बांध, पेऱ्ह, नालेखोले, मिरग असा खास कृषक् संस्कृतीशी संबंधित शब्दांचा वापर येथे दिसतो.

**पोटावर बांध, पेरनीची वटी**
**मूठ कुनबटी, पेऱ्ह वं बाई**

तिफणीने पेरणी करताना तिफमागे चालणारी व्यक्ती कमरेला बियाण्याची खोळ म्हणजे वटी बांधते. एकेक मूठ तिफणीवर ठेवून पेरणी करते, अशा जिवंत उल्लेख या कवितेत आहे.

कवी वा. नां.च्या कवितेतील आशय विविधांगी आहेत. कुटुंब, त्यातील विविध नाती, बालपण, शेती अशा अनेकविध विषयासोबत कवींचा समाजाकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि सामाजिक भानही कवितांमधून निपजताना दिसते. समाजातील विविध क्षेत्रात होणारा बदल खरंच प्रगतीकडे नेणारा आहे काय? अशी शंकाही कवीच्या मनात निर्माण होते.

या कवितासंग्रहातील पहिली कविता आणि तिच्यातील आशय विचार करावयास भाग पाडतो. 'प्रारंभ शेवटाचा' या कवितेत माणूस प्रगती करतोय की विनाशाकडे जातोय या दूरगामी जाणिवेतून कवीने आपली खंत व्यक्त केली आहे. पवन्या, कुंदा, बांध, झडी, पूर या शेतीविश्वाशी संबंधित संकल्पना अस्पष्ट होतानाची कवीच्या ठायी निर्माण झालेली खंत संवेदनशील मनाला जाळते आहे.

**डोळ्यासही दिसेना पवन्या कुठेच आता**
**कुंदा सतावताना दिसतो पिकास नाही**
**आता जनावरांना द्यावा कुणी भरोसा**
**झाडी तुटून गेली घरटे पिलास नाही**

असे म्हणतानाच सारे जणू काही विनाशाकडे जाताना दिसूनही कोणाला



त्याची खंत नाही की, कोणी उदास दिसत नाही, याचे वैषम्य कवीला जाणवते आहे.

'झाड' या कवितेत करपणाऱ्या गवतात कवीला शापित आणि अर्धपोटीवर्ग दिसतो. समाजात सदासर्वकाळ वास्तव्यास असणारी विषमता, करपलेले गवत आणि हिरव्यागार पिकांच्या प्रतिमांमधून कवीने चपखलपणे मांडलेली दिसते. तर शेतकरी वर्गासाठी शेत, घर, गोठा आणि हंगाम म्हणजेच आनंदोत्सव असल्याचे 'सण' या कवितेत म्हटले आहे.

'गुन्हा' कवितेत वा. ना. आंधळेंच्या स्वतंत्र कल्पनाशक्तीची आणि आपल्या अनुभवविश्वातील प्रतिमा वापरल्याची साक्ष पुन्हा पटते. भिजलेली वाणी, हंबरला गोठा, वेदनेचा एका यातून त्यांच्या कल्पनेची भरारी आणि वापरलेल्या प्रतिमांची प्रचिती येते. झपाट्याने बदलणारी माणसे आणि त्यांची मने 'मीना' या कवितेत दिसतात. प्रमाण मराठीत अफवा किंवा ऐकीव या शब्दांना प्रतिशब्द म्हणून वापरला जाणारा 'अवार्ड' हा शब्दही त्याच्या प्रादेशिक शब्दसंपत्तीच्या वापराची साक्ष देतो. 'कोंडवाडे' या कवितेत आदर्श चेहरा पण आतून फाटलेला, दाही दिशात दिसतो माणूस आटलेला, आणि पुन्हा मढ्याला शृंगार बाटलेला अशी शब्दचमत्कृती विलक्षण वाटते.

वा. ना. आंधळेंच्या कवितेत प्रतिमा आणि प्रतीकांची रेलचेल जागोजाग दिसते. तशी अलंकारिकता ही दिसते.

**ऊन वारा चांद तारा पावसाच्या शुभ्र धारा**
**रंग त्याचे गंध त्याचे दान देई अमृताचे**
**तूच उपादि तूच अनंता सर्वस्पर्शी तू नियंता**

असा अनुप्रास 'ऋण' कवितेत साधलेला आढळतो. 'तुला या कवितेतील 'काट्यांनाही बोचतील अशा तुझ्या वेदना' ही कल्पना म्हणजे प्रस्तुत कवीच्या वेगळ्या आणि अस्सल प्रतिभेचा आविष्कार दिसतो. याच कवितेत, 'अंधाराला वाहणारी रात्र असते एकटी' ही कल्पनाही वेगळ्याच विश्वात घेऊन जाते. 'तू गोंदणी' या लावणीसदृश कवितेतील स्त्रीसौंदर्याचे वर्णन करताना कवीच्या प्रतिभेला बहर आलेला दिसतो. 'मर्ढेकर' कवितेत समाजातील काही लोकांच्या असंवेदनशीलतेला शेतात बेफाम वाढणाऱ्या कुंद्याची उपमा दिली आहे. याचबरोबर वाळणारी शाई, देव्हाऱ्यातील पानाफुलांचे तोरण, कमरेतले वाकणे, आभाळाची फांदी, चुरगळलेले ऊन आणि खोऱ्यातील काकडणारी गाणी यांसारख्या प्रतिमा प्रतीकांचा वापर कवीच्या प्रतिभेचा आविष्कार दर्शवितो. वा. ना. आंधळेंच्या स्वतंत्र प्रतिभेचा अविष्कार आणखी अनेक ठिकाणी जाणवतो. त्यात दिवसाला मारणारी रात्र, खोट्या सुखाचा पाढा, जखमांवरचं भाळणं, पोळणारे स्वातंत्र्य,

कागदाच्या गठ्ठ्यातील तक्रार, कमरेत वाकलेली लोकशाही, कुपोषित लोकशाही, भरजरी भाषणे, अनाथ पदव्या, श्वापदांची गर्दी, सत्याचे सरण, पाकळ्यांना चांदण्याने पोळणे, काट्यांना बोचणाऱ्या वेदना, दवबिंदूंची गोंदणी, उंबराचं सोनं, वाळकी पाने अशा प्रतिमा आणि प्रतीकांचा समावेश होतो.

**समाजातील विसंगती आणि दांभिकपणावर बोट**

समाजातील वास्तवाचे प्रतिबिंब साहित्यात पडत असते. कवी हा अतिशय संवेदनशील मनाचा असल्याने सभोवताली घडणाऱ्या घटना-घडामोडींचा त्याच्या मनावर परिणाम होत असतो. कवी वा. ना. आंधळे यांनी समाजात पाहिलेले वास्तव, त्यातील विसंगती, दांभिकपणा आणि खोटारडेपणा कवितेत नेमकेपणाने मांडल्याचे दिसते.

गावात माणसांचा बंदिस्त कोंडवाडा
खोटाच पण सुखाचा गावात रोज पाढा

कोंडवाड्यात असली तरी सुखाचा 'नसलेला दर्प' दरवळविणारी मंडळी 'पाढा' या कवितेत चितारली आहे. कधी कधी असत्य सत्यावर मात करते, प्रकाशाला काळोख जड भरतो हे, वा. नां.च्या

दिवसास मारणारी प्रत्येक रात्र येते
रस्त्यात कंदिलांचा पडतो प्रकाश थोडा

या ओळींमधून प्रकटते.

'मी ही न हारणारा' या कवितेत वेदनांना न घाबरणारा आणि जखमांवर भाळणारा विलक्षण कवी दिसतो. समाजातील वास्तवावर बोट ठेवत आणि दांभिकपणावर हल्ला चढवित कवी म्हणतो,

ओठात वेगळा अन् पोटात वेगळा तू
पाहून वेळ माळा खुंटीस टांगणारा

अशा ओळी वाचताना सामान्य वाचकांसही समाजातील वास्तव स्पष्टपणे कळते. पण ते मांडण्याची शैली आणि धारिष्ट्य सामान्यांकडे नसते. ते असते प्रतिभावान कवीकडे! वस्तूत: या कवितासंग्रहातून वा. ना. हे आत्यंतिक भिन्न भिन्न रूपात आणि भूमिकांमधून वाचकांसमोर येतात. कधी मातृहृदयी सात्त्विक मनाचे, कोठे कृषी आणि ग्रामजीवनाचे चपखल चित्रण करणारे, कधी उदात्त आणि समर्पणभावनेने प्रेमाचा आविष्कार करणारे, कधी समाजातील वास्तव आणि विसंगती टिपताना खंत व्यक्त करणारे तर कधी खोटेपणा आणि दांभिकपणावर प्रखर हल्ले चढविणारे वा. ना. आपल्याला दिसतात. त्यांच्या 'कोडे' या कवितेत,

**चौफेरले विषारी इथे किडे मकोडे**



**नाही भल्याभल्यांना सुटले अजून कोडे**
**आख्या जगात माझ्या देशास तोड नाही**
**खाता कितीक आता नेला वरुन जोडे**

अशी उपरोधिक टिपणी केलेली आहे. आपल्या परंपरावादी मनोवृत्तीवर उगाच लेखणी झिजवू नये, असेही ते स्वत:ला बजावताना दिसतात. 'स्वभाव' या कवितेत समाजातील भामटी प्रवृत्ती, गुंडांना पोसणारे साव, मुर्खांना मिळणारी प्रतिष्ठा, पाय चाटणारी प्रवृत्ती यांवर कवीने घणाघाती आक्रमण केले आहे. तर 'सल्ला' या गझलमध्ये आपल्या विरोधकांना खडे बोल सुनावताना स्वत:मधील कणखरपणा हा नवा पैलूही समोर आणला आहे. 'सल्ला' कवितेत लागलेला सूर 'कावळ्याच्या शापाने' या कवितेत अधिक तीव्र सप्तकात गेलेला दिसून येतो. मूर्खांची पर्वा न करणारा आणि अनिष्टांना खडे बोल सुनावणारा कवी पुन्हा ठळकपणे सामोरा येतो.

'वरार' या गझलमध्ये समाजातील असंवेदनशीलतेवर बोट ठेवले आहे. समाजामध्ये माणसाची आणि माणुसकीची वाताहत होताना कवीचे मन विकल होते, जखमी होते. त्याच्या मनात अशी जागा नाही, की तेथे वार झाला नाही.

**आदर्श पुस्तकांच्या आतून छापलेले**
**बाहेर माणसांनी माणूस ठार केला.**

असे समाजातले जळजळीत आणि टळटळीत सत्य कवी आपल्यासमोर सहजपणे घेऊन येतो.

अशाच प्रकारची सल आणि खंत कवीने 'खुजे वर्तमान' या गझलेतही प्रखरतेने व्यक्त केली आहे. देशापेक्षा पैसा मोठा झाला. कसलीही लाज न बाळगणारे राजकारणी महान झाले. तत्त्व, सत्य, सत्त्व केवळ इतिहासजमा झाले. सगळीकडे लबाडांचे साम्राज्य असेल तर सत्याचा आग्रह कोठे धरावा, असा रोखठोख सवाल कवीने उपस्थित केला आहे. आपल्या समाजातील नकारात्मक वास्तव कवीला सतत अस्वस्थ करताना त्यांच्या कवितेतून जागोजाग दिसते. यामुळे कधीतरी कवी उद्विग्न होतो. 'बापू' या गझलमध्ये,

**बापू तुझी अहिंसा भट्टीत जाळणारे**
**स्वातंत्र्य पाहिले मी आतून पोळणारे**

असे प्रत्ययकारी वास्तव त्यांच्या लेखणीतून प्रकटते. येथील स्वातंत्र्य समाधान देणारे नाही. अहिंसेची येथे पायमल्ली होते आहे. सर्वत्र थुंकी झेलणाऱ्यांची स्पर्धा येथे लागली असताना बाणेदार लोकांचा इतिहास कोणास सांगावा? असा प्रश्न कवीला पडला आहे.

**तक्रार कागदांच्या गठ्ठ्यात बांधलेली**

**कार्यालयात फेऱ्या दिसतात मारणारे**

तक्रारींची दखल येथे कोणी घेत नाही. कार्यालयात केवळ फेऱ्या मारणारे दिसतात. असे आजच्या शासकीय कार्यालयातील वास्त चित्र कवीने सोप्या पण चपखल शब्दांत मांडले आहे. अर्थात हे वास्तव कवी जेव्हा समाजासमोर आणू पाहतो, तेव्हा त्याला 'झाला मोठा हुशार' म्हणून हिणविणाऱ्यांचीही येथे कमी नाही. सभोवतालच्या भ्रष्ट सिस्टीमविषयी मत नोंदवताना,

**टाकून भाकरीला खातात लोक पैसे**
**छाटा खुशाल जिव्हा बोलेल मात्र शाई**

अशी धिरोदात विरोधाची आणि विद्रोहाची भाषा येथे कवी करतो. घाम गाळणाऱ्या आणि कष्ट उचलणाऱ्यांनाच येथे आत्महत्या करावी लागते, अशी आमच्या देशाची कुबडी आणि कमरेत वाकलेली लोकशाही आहे. आमची लोकशाही कुपोषित आहे, असे कवी 'भलाई' या कवितेत परखडपणे मांडतो. तर 'व्यथा' कवितेत सत्तेपुढे शहाणपण थिटे आणि मान टाकून असल्याची भावना व्यक्त झाली आहे. 'बंदी' या कवितेत,

**बोंबा तुम्हीच मारा आम्ही करू कमाई**
**कोणास काय त्याचे नाही नवीन काही**

आपल्या देशातील समाजातील सध्याची स्थिती, त्याबद्दलची खंत आणि चीड या कवितेत व्यक्त झाली आहे. बापूंच्या तत्त्वज्ञानाची कास धरीत येथील शाई गद्दार होणार नसल्याचा विश्वास कवीच्या ठिकाणी दिसतो आहे.

**मवाल्याला टिळा । संत झाले चोर**
**पाठीमध्ये वार । गरिबीच्या**

अशी खंत 'वाटा' या कवितेत दिसते.

कवीला खोटे वागण्याची, दांभिकपणाची आणि भामट्या प्रवृत्तीची प्रचंड चीड आहे. अशा प्रवृत्तींवर ते कवितेतून वारंवार आसूड ओढताना दिसतात.

**कुत्र्यास प्यार देती इमल्यात राहणारे**
**माणूस भेटल्यावर म्हणतील हाड त्याला**

माणसाला प्राण्यापेक्षाही हीन वागणूक देणाऱ्या भामट्यांच्या मांदियाळीची गय मुळीच केली जाऊ नये, असे परखड मत 'त्याला' कवितेत कवीने मांडले आहे.

'सती गेली' या कवितेत विकासाचे तीन-तेरा आणि अन्यायाला गती आल्याचे कवी सांगतो. आज प्रामाणिक लाकूडतोड्याची गोष्ट सांगण्याची सोय राहिली नाही, एवढा समाज बदलला. भरदिवसा लोकशाहीचा खून होत आहे. देशभक्ती बापूजींच्या मागे सती गेल्याची खंत कवीने व्यक्त केली आहे. 'दुर्दैव' या रचनेत

**बापूगिरी पडली मागे चलती दादागिरीची**
**बडव्यांनो टवाळकी थांबवा आला हरिची**

ज्यांना सभ्य भाषा कळत नाही, अशांपुढे भरजरी भाषणे देण्यात अर्थ नाही. जेथे वशिला मोठा आणि पदव्या अनाथ झाल्या, जेथे पैशांसाठी संप्रदाय चालतात अशा व्यवस्थेवर प्रहार करण्याचे काम कवीने केले आहे. कवीच्या मनातील खंत आणि विषण्णता येथे थांबत नाही. 'माणूस' कवितेत, कावळ्यांच्या राज्यात गारद्यांचा सत्कार होतो आहे. कोण कोणास वाली, हे कळत नाही. येथील व्यवस्थेत सारेच सांगणारे आहेत. ऐकणारे कोणी नाही. आदर्श भासणाऱ्या हालचाली प्रत्यक्षात फाटलेल्या आहेत. सारी सत्ताच भामट्यांच्या हातात गेल्याची खंत आणि चिंताही कवीला ग्रासते आहे.

'पेटण्याला' या कवितेत आपल्या लोकशाही व्यवस्थेवर आणखीन एक जोरदार प्रहार कवीने केला आहे.

**जीभेवर टाका, मारू कशा हाका**
**म्हणे बोलू नका, इथे लोकशाही**

येथे लोकशाहीत बोलायची चोरी आहे. पोटातली आग विझत नाही. येथे अब्रूलाही धाप लागली आहे. कवितासंग्रहातील 'शेत' ही कविता तर थेट केशवसुतांची आठवण करून देत तिच परंपरा पुढे नेण्याची भाषा करते आहे. 'स्पर्श' कवितेत,

**कापूस काढणारा श्रीमंत देश माझा**
**अद्याप नागवा का चौकातला भिकारी**

अशी विसंगती कवीने टिपली आहे. शहरात स्वच्छतेची मोहीम चालू असताना तुंबलेल्या गटारी दुर्लक्षिल्या जातात. कमरेत वाकण्याची स्पर्धा इथे लागलेली असताना आपला आदर्श कोणता हे ठरविणे कवीला अवघड जात आहे. म्हणजे समाज व्यवस्था कोलमडत असतानाच येथील समाजाची विचारप्रक्रियाही कुंठीत झालीय. त्यामुळे कवीचे चिंतनशील आणि संवेदनशील मन द्विधा होताना दिसते आहे.

गझल हा काव्यप्रकार वा. ना. आंधळेंचा विशेष आवडीचा आहे. या संग्रहाला नाव दिलेली कविता 'फर्मान' ही कवितादेखील गझल स्वरूपात असून समाजातील वास्तवावर ती प्रकाश टाकणारी आहे. तर 'पहाड' या रचनेत,

**बदलून रंग येथे बदलून झाड आहे**
**कोणास दोष द्यावा, जो तो लबाड आहे**

अशी काहीशी पुनरावृत्ती करणारी भावना येथे व्यक्त होताना दिसते आहे.

अर्थातच परिस्थितीविषयीची खंत येथे आहे. या संग्रहातील अखेरची 'अब्रूही कवितादेखील व्यवस्थेसंबंधी खंत व्यक्त करणारी आहे.

**दररोज कोंडमारा, युरिया कधी हवाला**
**गर्दीत श्वापदांच्या माणूस ठार झाला**

अशी राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेवरील खंत व्यक्त झाली आहे. येथील प्रसारमाध्यमे प्रामाणिक, वस्तुनिष्ठ आणि परिपक्व नाहीत. त्यांचाही आवाज फाटका आहे. केवळ भाषणे आणि घोषणांनी गरिबी संपणार नसल्याची खंत येथे पुनश्च व्यक्त झाली आहे.

**धर्म, प्रांत, भाषा आणि कवीचे पुरोगामीत्व**

धर्म ही तशी विधायक आणि वैचारिक बाब. पण त्याचा नंगानाच चालविल्याची खंत कवीला अस्वस्थ करते. 'रांगा' या कवितेत सत्याचे सरण रचले जाऊन त्यावर अहिंसा जळत असल्याची भावना कविमनातून प्रकटते.

**तुला बोबडे बोल प्रिये मग काही भाषाभाषी**
**कुराण-गीतेमध्ये लावला हा कोणी दंगा**

अशी मांडणी करताना कवीच्या मते, विचारांची आणि भावनांची देवाणघेवाण करण्यासाठी 'बोबडे बोल'ही पुरेसे असतात. मग भाषावाद कशाला? खरे वार झेलणारे निघून गेलेत आणि भारतमातेच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्यांच्या रांगा लागल्या असल्याची चिंता कवीला लागली आहे. या कवितेतील कवीचे चिंतन, विचार आणि भावना त्याच्या पुरोगामित्वाची साक्ष देतात. धर्मभेद आणि भाषावाद कवी मनाला खिन्न करतात.

या कवितासंग्रहातील कवीच्या पुरोगामी विचारांची धार अधिक तीक्ष्ण होते ती 'घाव' या गझलमध्ये. मूर्तीपूजा, देवभोळेपणा आणि दांभिकपणावर मार्मिक घाव कवीने येथे घातला आहे. माणसाला दगडाइतकीही किंमत न देणाऱ्या दांभिक समाजाची आणि मनोवृत्तीची चिरफाड वा. ना. आंधळेंनी 'घाव' मध्ये केलेली दिसते.

**शब्दात दुःख इथले मांडू तरी कसा मी**
**जो भेटला तयाच्या आतून घाव आहे**
**दगडात देव येथे दगडास भाव आहे**
**बाकी जनावरांना माणूस नाव आहे**

प्रत्येकाचे दुःख जाणणारा आणि देव दगडात शोधणाऱ्या समाजाला परखडपणे फैलावर घेणाऱ्या वा. ना. आंधळेंच्या कवितेत संवेदनशीलता आणि पुरोगामित्व यांचा सुंदर मेळ बघायला मिळतो. अशाच अर्थाची आणि माणुसकी आटल्याची खंत 'कोंडवाडे' या गझलमध्ये दिसते.



वा. ना. आंधळेची कविता पुरोगामी आहे तशी चांगल्या परंपरांची आणि संस्कारांचे जतन करणारीही आहे. मराठी संतसाहित्य, संतपरंपरा, महात्मा गांधींची तत्त्वे यांच्या प्रति खोलवर आपपरभाव या कवितेत जाणवतो 'मराठी माती' या कवितेत ज्ञान ज्यांची ओळख आहे, असे संत ज्ञानदेव, कर्मात देव मानणारे आणि चिखलात देव शोधणारे संत गोरोबा, शेतीत देवधाम शोधणारे सावता माळी, सनातन समानतेचे प्रतीक असणारे संत चोखामेळा, आपले ज्ञानदान केवळ महाराष्ट्रापुरतेच मर्यादित न ठेवता उत्तर भारतात नेणारे संत नामदेव, कष्टकरी संत जनाबाई, सतत नामात दंग असणारे संत तुकाराम, उद्योगातच हरी रमतो असे सांगणारे संत नरहरी सोनार, भुतदयावादी संत एकनाथ आणि संत कान्होपात्रा या संपूर्ण संतपरंपरेला एका ओवीत बांधण्याचा यशस्वी प्रयोग कवीने येथे केला आहे.

आपली मातृभूमी, आपला देश आणि गाव यावरचे प्रेमही कवीचे लपून रहात नाही. देश स्वतंत्र झाला तरी मातृभूमीचे दुःख संपलेले नाही. शाळेत शिकवली जाणारी प्रतिज्ञा कवीच्या हृदयावर घाव घालते. आम्ही पुस्तकात वेगळे शिकतो आणि प्रत्यक्षात भलतेच असल्याची तीव्र खंत कवीच्या ठायी असतानाच लेखणी मोडून तिच्या मशाली करून देश बदलाची आशा कवीने 'मशाली'या कवितेत केली आहे.

धर्म, भाषा, प्रांत यांची बंधने तोडू पाहणाऱ्या कवीने आपल्या गावाने घातलेली भुरळ 'मह्य गाव' या कवितेत घातलेली दिसते. या कवितेत कविने आपल्या जळगाव जिल्ह्यातील एरंडोल गावाची महती मांडलेली दिसते. अंजनीच्या काठावरील या गावातील वाडे, चौक, दरवाजे चिरेबंदी असल्याचा उल्लेख त्यांनी केला आहे.

**मंदिरात अल्ला । मशिदीत देव ।**
**अशी देवघेव । माणसात**

असे धर्मनिरपेक्ष वर्णन कवितेत बघायला विरळच! या गावतील पाहुणचार देण्यासाठी एरंडोलकर कधीही तत्पर असल्याचे कवीने गौरवाने म्हटले आहे.

**वा. ना. आंधळे यांची सात्विक प्रेम कविता**

'फर्मान आणि इतर कविता' हा संग्रहच मुळी विविधांगी आणि भिन्न भिन्न रंगातील आशयाचा आहे. त्यातील एक रंग प्रेम हाही आहे. वा. ना. आंधळेंसोबत धुळ्याच्या का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेत एम.फिल. करीत असताना त्यांच्या प्रेमकविता आम्ही ऐकत असू. त्यावेळी त्यांच्या कवितांना दाद देण्यामध्ये प्रा. चत्रभुज पाटील, प्रा.किशोर पाटील आघाडीवर असत. या संग्रहात अंतर्भूत असलेली 'तू' ही गझल आजही अंतर्मुख करते.

**रातराणीच्या फुलांची गंधवेडी माळ तू**
**पाकळ्यांना चांदण्यांनी मात्र होते पोळले**
**या मंतरलेल्या शब्द रचनेबरोबरच,**
**तोडली गेली तरीही वाकली न एकदा**
**जीवनाला या तऱ्हेने तू असेच माळले**

प्रेमविषयक उदात्त आणि उच्च कोटीतील विचार आणि भावना अतिशय समर्पकपणे व्यक्त होताना दिसते. वा. नां.चा 'गझल' हा काव्यरचनाप्रकार विशेष आवडता दिसतो. त्यांच्या बहुतांश प्रेमकविता या गझल प्रकारात आहेत. त्यांच्या प्रेमकवितांमधील विशेष म्हणजे उदात्त आणि समर्पणाची भावना!

**चांदण्याचे गीत गातो साथ तू देशील का?**
**मी दिव्याची वात होतो सांग तू जळशील का?**

गीत कशाचे, तर चांदण्याचे! त्यासाठी कवीला साथ हवी आहे. त्यात रसिकताही आहे. पुढे जाऊन तेवणाऱ्या दिव्याची वात होण्याची इच्छा म्हणजे समर्पण आहे. वात ही जळतच असते. तेथे कविता साथ हवी आहे आणि साथ द्यावयाचीही आहे. मराठीतील एकूण कवितेवर नजर टाकल्यास अश्लीलता, ग्राम्यता आणि दुर्बोधता भल्याभल्यांना टाळता आली नाही. वा. ना. आंधळेंची प्रेमकविता सहज सोपी आहेच. पण त्याचबरोबर अत्यंत सुसंस्कारी, सभ्य आणि सात्विक प्रेमाचा आविष्कार करणारी आहे. त्यांच्या कवितेत वारंवार डोकावणारा त्याग आणि समर्पणाचा भाव त्यांना वरील संस्कारांचा आणि त्यांच्यातील सभ्य, सुसंस्कृत आणि चिंतनशील व्यक्तिमत्त्वाची साक्ष देतो.

**ती पाहा देण्यास खांदा सज्ज झाली माणसे**
**आसवे लपवून सारी भेटण्या येशील का?**

अगदी शेवटच्या निर्वाणीच्या क्षणीही तिने भेटण्यासाठी यावे, अशी कविमनातील आस येथे प्रकटताना दिसते.

'तुला' या कवितेत, आपल्या सखीचे दु:ख आणि वेदना पाहून कवी व्यथित होतो. पण ते दु:खही हसत हसत आणि सुखाने पाहायचं असे कवी म्हणतो,

**काट्यांनाही बोचतील अशा तुझ्या वेदना**
**कशासाठी सांग बरे वळून पाहायचं**
**ठेव जपून स्वप्नांना सखे तुझ्या डोळ्यात**
**दु:ख जरी आलं तरी ते सुखानं पाहायचं**

असा उदात्त आणि संयमी साजण कवी प्रियतमेस देतो. समाजातील दांभिकपणावर आणि माणसांतील खोटारडेपणावर हल्ला करणारा कवी जेव्हा



आपल्या प्रिय व्यक्तीस सल्ला देतो, तेव्हा त्याच्या मनातील नितळ सौंदर्य प्रकटताना या कवितेत दिसते. विलक्षण संवेदनशील आणि प्रतिभावान व्यक्तीच अशा भिन्न भूमिकांमधून प्रकट होऊ शकते.

'मन तुझे नितळ' या गझलमध्ये,

**मन तुझे नितळ त्याचा ठाव लागतो**
**त्या मनात वेदनेचा एक गाव लागतो**

ज्या मनाला समोरच्याचे मन नितळ दिसते, मुळात त्याचेच मन नितळ असते. जणू आपल्या मनाचे प्रतिबिंब कवी समोरच्या व्यक्तीच्या मनात पहात आहे.

**खूप चांगलं वागणं पाप नाही**
**नेमकं हेच कळत नाही म्हणून घाव लागतो**

प्रांजळ आणि निष्पाप मन यापेक्षा वेगळे असूच शकत नाही. आपली प्रिय व्यक्ती वारंवार टाळू लागते तेव्हा कवी 'तुझे' या कवितेत,

**हे तुझे रागावणे हे जाळणे नाही बरे**
**रोजचे आता तुझे टाळणे नाही बरे**

अशी अतिशय सभ्य आणि सोप्या शब्दात विनवणी करतो. 'तू गोंदणी' या कवितेने कवीच्या रसिक मनाची पुरेपूर प्रचिती येते.

**बालकवीची फुलराणी तू शुक्राची चांदणी**
**नवी अप्सरा खिन्न जाहल्या रूप तुझे पाहुनी**

या ओळींमधील स्त्रीचे सौंदर्यवर्णन वाचताना तंतवाङ्मयाची आठवण होते. या रचनेतील 'सुहास्य भुलवी मनी', 'दवबिंदूंची गोंदणी', 'सागरलाटा तुझे ललाटा', 'चांद कसा अंगणी', बालकवीची 'फुलराणी', 'सुरेल तू लावणी' अशी शब्दचमत्कृती आणि प्रतिमांची पखरण कवीच्या अष्टपैलू लेखणीची चमक दर्शविते.

'अबोली' कवितेत,

**चंद्रात पाहतो मी प्रतिबिंब रोज राणी**
**स्वप्नात ये अशी अन् कानात सांग गाणी**

अशा शब्दांत आपल्या प्रियतमेस साद घालताना कवी दिसतो. तू कवीची लेखणी की श्रावणातील गंध आहेस? काहीही असली तरी माझ्या गझलेची कहाणी मात्र तूच आहेस! तुझ्या आठवांचे आभाळ मी माझ्या श्वासात कोंडले आहे. तू फार बोलणारी नाहीस हे माहीत असूनही स्वत: खूप काही बोलून गेल्याची भावना कवीच्या ठायी आहे. अर्थात हे बोलणे प्रियतमेसाठीच आहे.

**तू गझल या दिलाची गाऊ किती किती मी**

श्रावणात भैरवीच्या नरदू किती किती मी

'किती किती मी' ही कवीची गझल म्हणजे काव्य, शब्द, शृंगार आणि संगीताचा सुंदर मिलाफ आहे. या कवितासंग्रहात 'गझल' हा काव्यप्रकार अधिक वापरलेला असला तर ही गझल त्यांत सर्वोत्तम अशीच आहे!

**सकारात्मक आणि आनंदविभोर कविता**

वा. ना. आंधळेंच्या कवितेत समाजातील विसंगती आणि त्याविषयी कवीमनातील खंत जागोजाग दिसते. परंतु त्यामागे समाज आणि माणसाचे हित दडलेले आपणास पाहावयास मिळते. तशा त्यांच्या कविता विविध आशयविश्वांना स्पर्श करणाऱ्या असून सकारात्मक भाव प्रकटणाऱ्या आहेत. 'तूच माझी कविता' ही एक अशीच सकारात्मक आणि आनंदी भाव उत्सर्जित करणारी कविता आहे. ती प्रेमकविता आहे. तसेच प्रिय व्यक्तीच्या सहवासातील सुखद, सुरेल आणि आनंदविभोर करणारं गाणं आहे.

**तुझ्या पावलांचं जेव्हा जेव्हा येणं झालं**
**खरंच सांगतो माझ्या उंबराचं सोनं झालं.**

आपल्या प्रिय व्यक्तीच्या आगमनाने 'उंबराचं सोनं' झाल्याची भावना म्हणजे समोरच्या व्यक्तीच्या प्रति परमोच्च आदरभाव प्रकट करणारी शब्दयोजना होय. प्रिय व्यक्तीसंबंधित स्वप्ने पाहून प्रत्यक्ष सहवासाचा आनंद कवी घेताना दिसतो.

दिवाळी हा सण सार्वत्रिक असला तरी धुळे आणि जळगाव जिल्ह्यात तो विशेष उत्साहात साजरा होतो. नुकतेच लग्न होऊन सासरी गेलेल्या मुली दिवाळी सणासाठी हमखास माहेरी येतात. नोकरीनिमित्त बाहेरगावी असलेली तरुणमंडळी दिवाळीसाठी गावी येणार हे निश्चित असते. अशा दिवाळीचे वर्णन कवीने 'सण दिवाळीचा' या कवितेत केले आहे.

**भाऊभाच्याच्या ओढीनं सण दिवाळीचा येतो**
**माझ्या माहेराची सय माझ्या कानात सांगतो**

असे म्हणत या सणाची महती सांगितली आहे. माहेरची आठवण, सडा रांगोळ्यांमधून दिसणारी आईची माया, तिच्या संस्कारांचा ठेवा, वटवृक्षासारखी बापाची घनदाट छाया, स्वागताला उभी राहणारी भावजय, सुख-दुःखाच्या सोबतीची आणि मैत्रिणींच्या आठवणींचा मोहोळ या दिवाळी सणामुळे येतो असा अनुभव कवीने मांडला आहे. पुरुष असूनही महिलांच्या मनोविश्वातील नानाविध भाव-भावनांचा वेध घेण्याचा कवीचा हा प्रयत्न विलक्षण आणि संवेदनशील मनाची साक्ष देतो.

**तात्त्विक, वैचारिक आणि चिंतनशील कविता**



फर्मान आणि इतर कविता या संग्रहातील कविता चिंतनशील आहेतच. त्याचबरोबर या संग्रहातील काही कविता तात्त्विक आणि वैचारिक मांडणीवर आधारित आहेत.

'मन' या कवितेत मनाची करामत स्पष्ट करताना समर्थ रामदास आणि बहिणाबाई चौधरी यांच्या त्यांनी मांडलेल्या तत्त्वांना धरूनच मनाची वैशिष्ट्ये कवीने नोंदविली आहेत. या संग्रहातील अनेक कवितांमध्ये गांधी आणि गांधी तत्त्वज्ञान डोकावते. महात्माजींसारखे व्यक्तिमत्त्व देशाने जगात दिले याचा सार्थ अभिमान कवितेत दिसतो. याच देशात बापू राबले. बापू जसे बोलले तसे वागले यांचाही कवी उल्लेख करतो. तत्त्वज्ञानाचा आणि त्यानुसार वर्तन करण्याचा एक आदर्श ठेवा बापूंनी आपल्याला दिला असल्याचे कवी नमूद करतो.

'कर कविता' या कवितेत, कविता कशी करावी आणि कशी नसावी याबद्दलचे विवेचन कवी देतो. 'सलाम' या कवितेतून वा. ना. आंधळे यांनी समस्त कवींना, जिंदादिलांना आणि कवितेलाही सलाम केला आहे. मंगेश पाडगावकरांच्या 'सलाम' कवितेची आठवण येथे कोठेतरी येऊन जाते. 'खुलासा' या कवितेत मनुष्यजीवनावर भाष्य करतानाही व्यवस्थेसंबंधित खंत कविमनातून डोकावतेच! तर 'नको' या कवितेतून कवी वाचकास सल्ला देताना दिसतो. त्यात,

**संपले आयुष्य वाळक्या वाटेवरी**
**वाळकी पाने पुन्हा चाळू नको**

पैशांसाठी जीवनातील बहुमोल असा आनंद मातीमोल करू नये. दगडात देव असतोच असे नाही. पत्थराच्या मंदिराला भाळू नको, अशी पुरोगामी विचारसरणी कवीने रसिकांसमोर प्रकट केली आहे.

**बोलु नको कुणा, शब्द एक उणा**
**डोळ्यामध्ये गुन्हा साठवावा**

अशी क्षमाशील वृत्ती बाळगण्याबाबतचा सल्ला 'पाषाण' कवितेत दिसतो. मनुष्याकडे क्षमाशीलता असावीच! त्याचबरोबर पाषाणालाही पचविण्याची क्षमता असावी, असे मत कवी व्यक्त करतो. 'माझा प्रवास' या कवितेत काळाला पणतीमधल्या तेलाची उपमा दिली आहे. तर 'तारणारा' या कवितेत माणूस एक आहे. पृथ्वी एक आहे. या दोघांनाही तारण्याचा प्रयत्न करायला हवा असा 'वसुधैवक कुटुंबकम' विचार गझल काव्यप्रकाराद्वारा मांडला आहे. जातीधर्मांच्या भिंती भेदताना माणूस एक असल्याचा संदेश येथे दिला आहे. अन्न-पाणी-वारा यांत भेद नाही. रंग नाही मग पंक्तीत कसले भेद करता असा पुरोगामी विचार कवितेतून प्रकटला आहे. 'कॅलेंडर आणि ३१' या कवितेत माणसाचे जगणं

आणि कॅलेंडर यांची मनोविश्लेषणात्मक मांडणी केलेली आढळते.

कवी वा. ना. आंधळे आणि त्यांच्या 'फर्मान आणि इतर कविता' याविषयी थोडक्यात नमूद करावयाचे झाल्यास अतिशय संवेदनशील मनातून ही कविता अवतरली आहे. निसर्ग आणि कृषक समाजाशी जवळचे नाते सांगणारी आणि कुटुंबवत्सल अशी ही कविता आहे. संग्रहातील अनेकविध कविता या समाजातील विसंगती आणि दांभिकपणावर बोट ठेवीत, त्यावर जोरदार हल्ला करणाऱ्या आहेत. धर्म, प्रांत, भाषा यांचे भेद भेदणारी तसेच केवळ दगडातील देव न मानणारी ही पुरोगामी कविता आहे. उच्च कोटीतील प्रेमाचा आविष्कार या कवितेतून प्रकट होताना दिसतोच. परंतु त्याचबरोबर कमालीचा सकारात्मक भाव जागोजाग पेरलेला जाणवतो. यासोबत वा. नां.च्या स्वतंत्र अनुभवसृष्टीचा, प्रतिमानसृष्टीचा आणि स्वतंत्र शैलीचा प्रत्यय या समग्र कवितेतून येतो.